■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३०३ ■ सोमवार दि.२१ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 303 ■ Monday Dt. 21 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बीड जिल्ह्यात बांधकाम कामगार विभागातील महाघोटाळा

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# दलालाने लावला बोगसगिरीचा गुलाल रातोरात झाला मालामाल

## बोगस मृत क्लेम दाखवून दिवसाढवळ्या उचलला

## मृत असलेली व्यक्ती दोन वेळा जिवंत झाल्याने बीड जिल्ह्यात खळबळ

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रामध्ये सध्या बीड जिल्ह्याचे नाव खराब करण्यामध्ये अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांचा सिंहाचा वाटा आहे बांधकाम कामगार कार्यालयामध्ये व्यवसाय करणाऱ्या काम करणाऱ्या कामगारांसाठी शासन वेगवेगळ्या योजना राबवत आहे कामगारांना याचा फायदा झाला पाहिजे त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा विषय असेल काम करत असताना अपघात झाला किंवा मृत्यू झाला किंवा त्यांच्या इतर आरोग्य विषयी अडचणी असतील यासाठी कामगार नोंदणी आवश्यक आहे हे कामगार नोंदणी करत असताना त्यामध्ये अनेक नियमाने अटे आहेत त्यापैकी प्रमुख आठ म्हणजे कामगाराने ९० दिवस काम केलं पाहिजे याची सर्टिफाईड प्रमाणपत्र लागतात मृत्यू झाल्यानंतर नगरपालिका नगरपंचायत किंवा ग्रामपंचायतच्या अंतर्गत ज्या ठिकाणी कामगार वास्तव्यास आहे राहतात. त्या ठिकाणी मृत्यू झालेले मृत्यू प्रमाणपत्र लागतात मात्र काशीद हे बीडमध्ये जॉईन झाल्यापासून त्यांच्याकडे गेवराई आष्टी आंबेजोगाई आणि केज या चार तालुक्याचा कारभार आहे मात्र एकदा मृत्यू झालेली व्यक्ती काशीद यांनी दुसऱ्यांदा जिवंत करून ९० दिवस काम केलं आहे. याबाबतीचा लाभ त्या कुटुंबाला दिले आहेत दोषी असणाऱ्या व्यक्तींबरोबरच कामगार विभागातील दलाल आणि अधिकारी कर्मचारी यांच्या संगनमताने मिळत असलेला अनुदान हे वाटून घेतलं जात आहे प्रत्येक



### ८४ हजार बांधकाम कामगार आहे का? नोंदणीकृत लाभार्थी खोटे आणि खरे किती चौकशी कराच?

लाखोंच्या लाचेची माया काशिद व कंत्राटी कर्मचाऱ्यांना आर्थिक दलालांना फायद्यासाठी संबधित बांधकाम कामगार विभागात काही दिवसापूर्वी आलेल्या मुंबई मधील कमिटीच्या चौकशीत कोण दोषी समजलं नाही मात्र कमिटी आर्थिक तडजोडीत अहवाल काय देऊन गेले. एक जनतेला समजल नाही? त्यामुळे या प्रकरणाचे तात्काळ चौकशी व्हावी अशी मागणी होत आहे.

अनुदानाच्या पाठीमागे मयत क्लेम असेल तर काशीद यांना ५०% आणि मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना ५० टक्के असा वाटा बोगस मृत क्लेम दाखवून दिवसाढवळ्या उचलला जात आहे बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी शासनाच्या वतीने अनेक योजना राबवल्या मुलांसाठी शैक्षणिक साहित्य असेल स्कॉलरशिप असेल कामगारांसाठी मिळणारी किट असेल त्यामध्ये सेफ्टी पेटी हँड ग्लोज पायातील शूज डोक्यावरील टोपी सतरंजी मच्छरदानी बॅटरी डब्बा वॉटर बॅग आणि स्कूल बॅग मात्र हे सर्व जे प्रत्यक्ष कामगार काम करतात यांना शासन देत आहे मात्र नियमाची पायमल्ली करून जो आपल्याला कमिशन

▶ पान २ वर

### काशीद यांनी मृतांच्या नावावर खोटे दस्तावेज तयार करून करोडो रुपयांचा अपहार?



## पोलिसांकडून शिरूर कासार येथे जुगारावर छापा; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

शिरूर कासार । प्रतिनिधी

शिरूर कासार पोलीस स्टेशन पोलीस पथकाने दिनांक २० जुलै २०२५ रोजी आर्वी शिवारात एका शेतात लिंबाच्या झाडाखाली सुरू असलेल्या तिरट जुगारावर छापा टाकत कारवाई केली आहे. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पथकाने दुपारी ४.३० वाजताच्या सुमारास आर्वी



शिवारातील नमूद केलेल्या शेतात छापा मारला. या छाप्यात पोलिसांनी जुगार खेळणाऱ्या सहा

▶ पान २ वर

## शिरूर कासार पोलिसांनी फसवणूक प्रकरणातील फरार आरोपीला केले अटक

शिरूर कासार । प्रतिनिधी

शिरूर कासार पोलीस स्टेशनने गुन्हा क्रमांक १४८/२४, कलम ४०६, ४२० भा.दं.वि. अंतर्गत मागील एक वर्षापासून फरार असलेल्या आरोपी रवींद्र मनसुख बांदल, रा. कानोबाची वाडी, ता. शिरूर कासार, जि. बीड याला अटक केली आहे. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा शोध घेऊन त्यास पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड येथील मोरे वस्ती, श्रीराम कॉलनी येथून ताब्यात घेतले. १९ जुलै २०२५ रोजी त्याला अटक करण्यात आली.



आरोपीकडून गुन्ह्यात फसवणूक करून नेलेला एकूण ४९,०८८ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, ज्यात १३,६०० रुपये रोख रक्कम, जिओ कंपनीचा वायफाय सेटअप आणि इतर इलेक्ट्रॉनिक वस्तू (३५,४८८ रुपये) यांचा समावेश आहे. सदर कारवाई नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण जाधव यांचे मार्गदर्शनाखाली अधिकारी पोलीस हवालदार १२४५ बाळासाहेब सुरवसे आणि पोलीस हवालदार ७४३ राहुल नांगरे यांनी केली आहे.

## थरारक पाठलाग करून दारूसह १४ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त

### दोघांवर गुन्हा; राज्य उत्पादन शुल्क भरारी पथकाची कारवाई



बीड । प्रतिनिधी

बनावट देशी दारूची वाहतूक होत असल्याची माहिती दारूबंदी विभागाच्या भरारी पथकाला मिळाली. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक विश्वजीत अ.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्र.०२ यांनी रविवारी रात्री १० वाजता धारूर घाटामध्ये सदर वाहनाचा थरारक पाठलाग करून दारूसह १४ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आले आहे.

राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्र.०२ चे दुय्यम निरीक्षक यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे की, श्रीराम रंगाराव जाधव, वय ३६ वर्षे रा.शिवाजीनगर माजलगाव आणि पवन सुरेश मुळे, वय २५ वर्षे रा.श्रीरंगवाडी, ता.माजलगाव, जि.बीड हे दोघेजण रविवारी बनावट देशी दारूची वाहतूक करीत असल्याची माहिती दारूबंदी विभागाच्या भरारी पथकाला मिळताच थरारक पाठलाग करून रात्री उशिरा १० वाजता धारूर घाटामध्ये सदर वाहनाला ओव्हरटेक करून थांबविले, आणि तपासणी केली असता त्या वाहनात ९० मिली क्षमतेच्या ५० बनावट देशी दारूच्या (देशी दारू संजिवनी बॉबी संत्राचे) बॉक्स आढळून आले. यामुळे तात्काळ कारवाई करीत महिंद्रा कंपनीचे चार चाकी वाहन (एक्सयुव्ही-५००) ज्याचा नोंदणी क्रमांक (एमएच ४६, पी ४३१८) व विविध कंपनीचे दोन भ्रमणध्वनी सह एकूण १४ लाख ३० हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल

▶ पान २ वर

### आवाहन - अवैध व बनावट मद्य विक्रीची माहिती द्या

नागरिकांनी त्यांच्या परिसरात अवैद्य व बनावट मद्याची विक्री होत असल्यास त्या बाबतची माहिती राज्य उत्पादन शुल्क, बीड या विभागास माहिती द्यावी. माहिती पुरविणाऱ्याचे नांव गुप्त ठेवण्यात येईल. व अवैध मद्य विक्रीवर ठोस कारवाई करण्यात येईल.

**- विश्वजीत अ.देशमुख**

अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग बीड, जि.बीड.

## एसपी नवनीत कॉवत साहेब, चेअरमन केशव पंडीतची खातेदारांच्या डोळ्यांत धुळफेक

# गोल्ड व्हॅलीवरने बँकेलाच लावला लाखो रुपयांचा चुना







गेवराई । प्रतिनिधी

सोन तारण ठेवून कर्ज घेण्याकडे अनेकांचा कल वाढत आहे. खाजगी बँकांकडून कर्जदारांना गोड लोन दिले जाते मात्र या गोल्ड लोन मध्ये श्री. मंगलनाथ मल्टिपल निधी या संस्थेचे चेअरमन केशव शेषनारायण पंडित व गोल्ड व्हॅल्युवर प्रशांत सुभाष शेलार यांनी अनेक बँकेलाच लाखो रुपयाचा चुना लावला

▶ पान २ वर

### गेवराई पोलीस प्रशासनाने चौकशी करावी

शहरातील अनेक बँकेत खोटं सोनं तारण ठेवून लाखो रुपये कर्ज स्वरूपात रक्कम घेऊन मिळालेल्या माहितीनुसार जवळपास जास्तीत जास्त खोटं सोन बँकेला घान ठेवत संबंधित बँकेची दिशाभूल करत गोड लोन कर्ज खातेदार यांच्यासह सर्वांच्या डोळ्यांत धुळ फेकलीय या सर्व प्रकरणाची गेवराई पोलीस प्रशासनाने चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

### गोल्ड व्हॅल्युवर संशयाच्या भोवऱ्यात ?

या संपूर्ण प्रकरणात सोन्यांची किंमत मोजणारा गोल्ड व्हॅल्युवर प्रशांत सुभाष शेलार यांचे भूमिका संशयास्पद असल्याचे पाहायला मिळत आहे . गोल्ड व्हॅलीवरने आपले नातेवाईक असलेले चेअरमन केशव पंडित यांच्या सांगण्यावरून इतरांच्या नावे बनावट सोने अस्सल असल्याचे सांगून संबंधित खातेदारांना लाखो रुपयांचे कर्ज मिळून दिले आहे आजगयात शाखेतील असलेल्या लॉकरमध्ये जवळपास ४२ बनावट सोन्यांच्या बॅगा चौकशीत आढळून येतीलच मात्र पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत व जिल्हा पोलीस प्रशासनाने तात्काळ क्शन घेत कारवाई करावी नसता रातोरात ते बनावट सोने काढून घेण्यासाठी गोल्ड व्हॅलीवर यांच्यासह इतर लोक प्रयत्न करू शकतात ?असा अंदाज आहे म्हणून तात्काळ घोटाळेबाज बनावट सोने करणाऱ्या गोल्ड व्हॅलीवर यांच्यासह इतरांच्या कारवाई करून मुसक्या आवळाव्यात अशी मागणी करण्यात येत आहे.

# प्रशांत नगर कानडी रोड केज हा मुख्य रस्ताच गुत्तेदाराने टाकला खोदून!

केज । प्रतिनिधी

केज शहरातील प्रशांत नगर कानडी रोडचा वार्ड क्रमांक ४ चा मुख्य रहदारीचा रस्ताच खोदून टाकल्यामुळे या भागातील नागरिकांना रहदारी साठी तसेच वाहन ये–जा करण्यासाठी रस्ताच खोदून टाकल्यामुळे गैरसोय होत आहे. गेली पन्नास वर्षे झाले हा रस्ता आहे यावर नगरपंचायत अंतर्गत रस्ते व नाली बांधकाम बऱ्याच वेळा झाले असून याचे रीतसर बिल सुद्धा गुत्तेदारांनी उचललेले आहे. हा प्रशांत नगरचा मुख्य रस्ता आहे व तो जवळ पास पन्नास वर्षे झाले येथील नागरिकांच्या वापरात आहे. १५ फुट रस्ताच खोदून टाकल्यामुळे या




भागातील नागरिकांचे रहदारीसाठी तसेच वाहन चालवताना अतोनात हाल होत आहेत.
मोठी चार चाकी गाडी तर आतबाहेर जाणे शक्यच राहिले नाही. वकिलवाडी अंतर्गत येणाऱ्या या भागात रमेश आडसकर यांचे निवासस्थानअसून त्यांना मानणारा वर्ग या भागात मोठ्या प्रमाणात असून त्यांच्या शब्दावर या भागातील रहिवासी प्रत्येक वेळेस नगरसेवक निवडून देत आहेत. परंतु निवडून आलेल्या नगरसेवकांचे या भागाकडे कायम साफ दुर्लक्ष असते. एकदा का नगरसेवक निवडून आले की पुन्हा ते या भागात ढुंकूनही पाहत नाहीत असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. प्रशांत नगरचा मुख्य रस्त्याच खोदून टाकल्यामुळे या भागातील नागरिकांनी पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन केज येथे निवेदन दिले आहे. प्रशांत नगर भागात बहुतांश हिंदू नागरिक असून सदर रस्ता खोदणारा ईतर समाजा तील व्यक्ती असल्याने सामाजिक तेढ निर्माण होऊ शकते.
विशेष म्हणजे त्याने खरेदी केलेली कागदपत्रे तपासून घेतले पाहिजेत ही कागदपत्रे इनामी जागेची असून यात खरेदी–विक्री बाँडवर झालेले आहे. विषेश म्हणजे ज्याच्याकडून विकत घेतली आहे त्याच्या नावावर फेरफार नोंद सूद्दा झालेली नसताना त्याने विकलीच कशी हे पण प्रशासनाने पाहिले पाहिजे. यात पण मोठे गौडबंगाल आहे असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. तरी हा खोदलेला रस्ता खुला करून द्यावा अशी मागणी प्रशांत नगर भागातील नागरिकांनी केली आहे. केज नगर पंचायतीचे सिईओ, नगराध्यक्षा तसेच गटनेते व प्रशासनाने देखील तात्काळ हा प्रश्न सोडवणे आवश्यक आहे असे नागरिक मागणी करत आहेत.

# घरकुल धारकांना धनादेश वाटप करा, अन्यथा बीड न.प.ला टाळे ठोकू : वीर

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील घरकुल धारकांना दोन ते तीन दिवसात घरकुलाचे धनादेश न मिळाल्यास न.प. ला टाळे ठोकणार, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भावनाचे प्रणेते तथा बहिरवाडी चे माजी अशोक वीर यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात सांगितले आहे.



मार्च महिन्यात नवीन घरकुल साठी फंडा आला आहे. ३ ते ४ महिने झाले घरकुलाची यादी मंजुर व प्रसिध्द करुन, फलकावर लावण्यात आलेली आहे. बजेट पण आहे तरी पण ऐन पावसाळ्यात घरकुल धारकांनी घराचे बांधकामे सुरु केलेले आहेत. परंतु न.प.सिओ यांना सध्या सह्या करायला वेळ नाही म्हणुन बीड शहरातील घरकुल धारक न.प. मध्ये चकरा मारुन मारुन मेटाफुटीला आलेले आहेत. सि.ओ.अंधारे मॅडम यांनी दोन ते तीन दिवसात सह्या करुन धनादेश घरकुल धारकांना वाटप नाही केल्यास सर्व घरकुल धारकांना सोबत घेवुन न.प. बीडला टाळे ठोकण्यात येईल. काही अनुचीत प्रकार घडल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील याची नोंद घ्यावी. अशा स्वरूपाचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी यांना अशोक वीर यांनी दिले आहे.

# प्रदेशाध्यक्ष खा.तटकरे व आ.मुंडे यांची शेख निजाम यांच्या घरी स्नेहभोजन व सदिच्छा भेट

बीड । प्रतिनिधी




निर्धार नव्या पर्वाचा कार्यक्रमाच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे, महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रूपाली चाकणकर आमदार विजयसिंह पंडित प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण राष्ट्रीय प्रवक्ते परांजपे, कल्याण काका आखाडे, आ.विक्रम काळे, मा.आ.संजय दौंड, रमेशराव आडसकर आदी मान्यवर बीड नगरीमध्ये आलेले होते. सदरील आलेल्या मान्यवरांच्या स्नेहभोजनाचे आयोजन शेख निजाम व शेख अमर परिवार व मित्र मंडळातर्फे करण्यात आले होते.
यावेळी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात या ठिकाणी साजरा करण्यात आला व बीड शहरातील अल्पसंख्यांक बहुल भागातील अद्याप प्रलंबित प्रश्न संदर्भात असलेल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. ज्यात प्रामुख्याने अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या वस्तीग्रह, उर्दू घर, नवीन ईदगाह बालेपिर या ठिकाणी जाण्यासाठी काँक्रेट रस्ता व ईदगाह च्या ठिकाणी काँक्रिटीकरण, बिंदुसरा पात्रातील जागा पेठ बीड विभागातील ईदगासाठी द्यावी, जुना बाजार वेस ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा पर्यंत रस्ता, बीड शहरातील प्रमुख मोठे नाले ज्यात सेंटरनाला भाजी मंडई ते बिंदुसरा नदी, इस्लामपूरा, मोमीनपुरा, गांधीनगर, मिल्लत नगर, मोहम्मदीया कॉलणी, बिलाल नगर या सर्व परिसरातील रस्ते व नाली बनवणे तसेच कंकालेश्वर मंदिर व दर्गा परिसरातील नाला, बाले पीर भागातील बांगर नाला बनवणे, बिंदुसरा नदीचे नरिमन पॉईंट धरतीवर विकास करून उद्योग व्यवसायास चालना द्यावी या संदर्भातील मागण्या प्रदेशाध्यक्ष तटकरे व आ.धनंजय मुंढे, आ.विजयसिंह पंडित यांच्याकडे करण्यात आल्या.
या मागण्या संदर्भात तटकरे साहेबांनी मागण्यांचे सकारात्मक चर्चा करून अजित दादांच्या माध्यमातून सदरील प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले. यावेळी आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत शेख निजाम व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कामगार आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष शेख अमर जैनुद्दीन, खय्युम इनामदार, सत्तार इनामदार, शेख खदीर, सय्यद आजम, शेख जाकीर, शेख नसिर, मोमीन जुबेर आदींनी केले.



ईश्वर धन्वे यांच्या निवासस्थानी शिवनीचे धम्मशील आनंद भंतीजी यांचे चिवड देऊन स्वागत करताना उत्तम रावसाहेब धन्वे, माया उत्तम धन्वे, छाया ईश्वर धन्वे, सायली उत्तम धन्वे आदी.

# अर्धमसला येथील ग्रामस्थ बसले उपोषणाला

सिरसदेवी । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील अर्धामसला येथील ग्रामस्थ आज दि. २१/०७/२०२५ रोजी सकाळी १० वाजता ग्रामपंचायत कार्यालया समोर बसले आहेत. ग्रामपंचायत अंतर्गत २०२३ ते २०२५ पर्यंत जे कामे झाली आहेत. या कामाची चौकशी संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थानी केली आहे.
सविस्तर माहिती अशी कि, तालुक्यातील अर्धामसला येथे सन २०२२–२३,२४,२५ या कालावधी मध्ये मौजे अर्धमसला ग्रामपंचायत वर येणारा १५ वा वित्त आयोग हा अराखाड्यानुसार खर्च न केल्याने व काम न करता निधी उचलून सरपंच, ग्रामसेवक यांनी सगणमताने निधीचा भ्रष्टाचार केला आहे. तसेच नरेगा अंतर्गत अद्याप कुठलेच कामे न करता निधी उचलून शासनाची फसवणूक केली आहे. पांदन रस्ते व गाव अंतर्गत रस्ते इत्यादी कामाचा समावेश आहे. ही कामे न करता बिले उचलली आहेत यामुळे ग्रामसेवक, सरपंच यांच्यावर फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात यावे व त्यांच्या राहिलेल्या उर्वरीत निधी हा चौकशी होईपर्यंत ग्रामपंचायवर वर्ग करण्यात येऊ नये ही मागणी घेऊन आज दि.२१/०७/२०२५ रोजी सकाळी १० वाजता ग्रामस्थ ग्रामपंचायत समोर अमरण उपोषण करत आहेत.




पान १ वरून...

## दलालाने लावला बोगसगिरीचा गुलाल रातोरात झाला मालामाल

देईल टक्केवारी देईल त्या दलाला मार्फत बोगस कामगार नोंदणी करून खाजगी व्यक्तीच्या मार्फत हे साहित्य वाटलं जात आहे बांधकाम कामगार म्हणून नोंदणी करण्यासाठी हजारो रुपये घेतले जातात तर नोंदणी झाल्यानंतर लाभ मिळवून दिल्यानंतर सुद्धा कामगारांकडून पैसे घेतले जातात काशीद यांनी गेल्या चार वर्षापासून वाटप केलेले अनुदानाची फेर तपासणी करण्याची मागणी बीड जिल्हाधिकारी यांच्याकडे करणार आहे कोणताही क्लेम असेल अपघाताचा क्लेम असेल मृत्यूनंतर कुटुंबाला मिळत असलेला क्लेम असेल स्कॉलरशिप असेल काशीद यांच्या कार्यकाळातील प्रत्येक बांधकाम कामगाराच्या नोंदणीची माहिती लवकरच समोर आणणार आहे आसे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव के. के. वडमारे यांनी म्हटलं आहे.

## पोलिसांकडून शिरूर कासार येथे जुगारावर

इसमांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून रोख रक्कम ४,२९०/– रुपये आणि चार मोटरसायकल असा एकूण ३,२५,१३०/– रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.
याप्रकरणी आरोपी नामे दिलीप लिंबाजी गाडे, वय– ३५ वर्ष, रा. तरडगव्हाण, ता– शिरूर कासार, जि.बीड, बाबासाहेब भाऊराव कदम, रा.आर्वी,ता– शिरूर कासार, जि.बीड, गणेश बापूराव कासोळे, वय ३५ वर्षे, रा. भालगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, विठ्ठल पांडुरंग बांगर वय ५५ वर्षे, रा. सावरगाव, ता. शिरूर कासार जि. बीड, अंबादास रावसाहेब खेडकर, वय ३७ वर्षे, रा. भालगाव, ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर, सोमनाथ बबनराव मोहिते, वय ३८ वर्ष, रा. आर्वी, ता. शिरूर कासार, जि. बीड सर्व सहा आरोपींविरुद्ध शिरूर कासार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक २१३/२५ नुसार महाराष्ट्र जुगार अधिनियम कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी अवैध धंद्यांविरोधात आपली मोहीम यापुढेही सुरू ठेवणार असल्याचे स्पष्ट केले आहे.
सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी, पोलीस हवालदार क्रमांक १५३० तुषार गायकवाड, पोलीस शिपाई क्रमांक २२२१ सतीश बहिरवाल आणि पोलीस शिपाई क्रमांक २२२९ सुनील बहिरवाल यांनी केली आहे.

## थरारक पाठलाग करून दारूसह १४ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त

जागीच जप्त करून दारूबंदी कायद्यानुसार दोघांना अटक करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक विश्वजीत अ.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्र.०२ चे दुय्यम निरीक्षक जगदीश व्ही.कोरे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक आर.बी.कदम व जवान सर्वश्री आर.ए.जारवाल, एस.व्ही.धस, एस.पी.कदम, एस.एस.चाटे, बी.एस. वायबट यांनी पार पाडली. सदरील गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक जगदीश व्ही.कोरे करीत आहेत.

## गोल्ड व्हॅलीवरने बॅंकेलाच लाखो रुपयाचा चुना लावला

आहे. या घोटाळ्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या सगळ्या प्रकरणात गोल्ड व्हॅल्यूवरची भूमिका संशयास्पद असल्याचे म्हटले जाते.
हे प्रकरण गेवराई शहरात कुलकर्णी प्लाझा या ठिकाणी असलेली खाजगी बँक श्री. मंगलनाथ मल्टीपल निधी या बँकेतील असून मोंढा परिसरातील एक मल्टीस्टेट व माळी गल्ली येथील एका महिला पतसंस्थेत गोल्ड लोन मध्ये खोटं सोनातारण ठेवून तब्बल लाखो रुपये कर्ज घेतले हे गोड लोन वेगवेगळे ग्राहकांच्या नावे देण्यात आले आहे. दरवर्षी बँकेकडून सोन्याचा मूल्यांकन केले जात होते. दरवर्षी हा गोल्ड व्हॅलीवर सोन्याची तपासणी करून बँकेला माहिती देत असे हा गोल्ड व्हॅलीवर व चेअरमन खोट्या सोन्याला खरं सोनं असल्याचे सांगत लोन अकाउंट अपडेट करायचे या सगळ्या प्रकरणी बँकेचे शाखाधिकारी व संबंधित कर्मचारी यांना अंधारात ठेवत वेशीच्या आत आत्ताच फलक बदललेल्या कृष्णा ज्वेलर्स या ठिकाणी रातोरात हा खेळ चालत असल्याची खात्रीलायक माहिती मिळत आहे मात्र गोल्ड लोनच्या नावाखाली झोल सुरू असल्याची कुण कुण बँकेच्या अधिकाऱ्यांला लागताच प्रत्येक वेळी संबंधित गोल्ड व्हॅलीवर व चेअरमन कर्मचाऱ्यांची दिशाभूल करत होते. श्री.मंगलनाथ मल्टिपल निधी शाखेतील लॉकरमध्ये वेगवेगळ्या खातेदारांच्या नावे गोल्ड व्हॅलीवर प्रशांत शेलार यांनी तपासणी केलेले फ्रॉड गोड लोनच्या जवळपास ४२ बॅग असल्याची माहिती मिळाली आहे.
याबाबत जिल्हा पोलीस प्रशासनाने पावले उचलणे गरजेचे आहे आज पाच महिन्यांपासून वेड्याचे सोंग घेऊन फरार झालेले चेअरमन केशव पंडित स्वतःच्या नावे असलेली प्रॉपर्टी विकत २३ मार्च रोजी गेवराईतून नातेवाईकांच्या संगणमताने हॉस्पिटलच्या बहाण्याने पळ काढल्यानंतर अनेक खातेदारांना आपण ठेवलेले सोने व पैसे परत मिळतील की नाही असा ठेविदार वर्गांना प्रश्नः पडला असता हळूहळू नातेवाईकांच्या संगमताने केलेला करारनामा अखेर उघडकीस येत असल्याचीही चर्चा खातेदारांकडून ऐकवास मिळत आहे.

# मृत्यूनंतर पाच दिवसाचा दुःखवटा; उत्तम निर्णय!

## वरपगावातील देशमुख कुटुंबियांकडून आईची इच्छापूर्ती

आमच्या आत्या कै. मुक्ताबाई अच्युतराव देशमुख यांचे बुधवारी (ता.१७) पुण्यात निधन झाले. नव्वदी गाठलेल्या मुक्ता आत्या किती व्यवहारी विचार करत होत्या, हे त्यांनी कुटुंबियांकडे व्यक्त केलेल्या काही इच्छांवरून दिसून येते. त्यातील एक, 'माझे निधन कोठेही झाले तरी अंत्यविधी गावीच करावा' तसेच दुसरी आणि महत्त्वाची इच्छा म्हणजे,'अंत्यविधीनंतर पाच दिवसांत सर्व कार्यक्रम उरकावेत, त्यानंतर कोणतेही कार्यक्रम करू नयेत.' त्यानुसार कुटुंबियांनीही अंत्यविधी आमचे गाव वरपगाव (ता.केज, जि. बीड) येथेच केला. त्यानंतर तिसऱ्या दिवशी 'सावडण्या'चा, चौथ्या दिवशी 'दहावा' आणि पाचव्या दिवशी 'दिवसाचा' (गोडजेवणाचा) कार्यक्रम होईल, असे जाहीर केले. आत्यांची इच्छापूर्ती करण्याचा देशमुख कुटुंबानेही घेतलेला निर्णय व त्याला गावकऱ्यांनी दिलेली साथ वाखाणण्याजोगी आहे.
शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन राहिलेले श्री. अच्युतराव देशमुख गुरुजी सेवानिवृत्तीनंतर केज येथे स्थायिक झाले होते. इंजिनिअर असलेले त्यांचे मोठे चिरंजीव हनुमंत देशमुख हे निवृत्तीनंतर पुण्यात स्थायिक झाले. दुसरे चिरंजीव सतीश हेही इंडियन नेव्हीमधून निवृत्त झाल्यानंतर व्यवसायाच्या निमित्ताने पुण्यातच स्थायिक झाले. मुलगी विद्या लातूर मध्ये असते. वयोमानाप्रमाणे पुढे आत्या आणि मामा दोघेही पुण्यात गेले. मागील दोन वर्षापासून मुक्ता आत्यांची तब्बेत साथ देत नव्हती, मात्र त्यांची इच्छाशक्ती प्रचंड होती. त्याचा एक अनुभव म्हणजे त्यांच्या नातवाचे (मुलीच्या मुलाचे) लग्न लातूरला होते. त्यांना त्या लग्नाला जायचं होतं.त्या बेडवर होत्या. त्याची हाडं ठिसूळ झाली आहेत, असे डॉक्टरांनी सांगितले होते. त्यामुळे प्रवास करणे शक्य नव्हते. मात्र त्यांनी मला काही होणार नाही, मला लग्नाला जायचच आहे, असा हट्टच धरला म्हणता येईल. न्यायचं तर कसं? असा प्रश्न उपस्थित झाला. अँब्युलन्सने न्यायचा विचार सुरू असतानाच डॉक्टरांनी रस्त्यांची परिस्थिती पाहता रेल्वेने जाणे सुरक्षित राहील असा सल्ला दिला. त्यानुसार त्यांना रेल्वेने लातूरला नेले. लग्नाच्या वेळी व त्यानंतर तासभर त्या मंडपात बसून राहिल्या. सर्व नातेवाईकांशी गप्पा मारल्या. पुण्यात परतल्यानंतर त्यांना त्या प्रवासाचा व दगदगीचा त्रास झाला नाही. हे शक्य झाले ते केवळ त्यांच्या इच्छाशक्तीमुळे. पुढे आजारपणात अनेक इच्छा, अपेक्षा कुटुंबाकडे व्यक्त केल्या. त्यातील सर्वात महत्त्वाची इच्छा म्हणजे 'पाच दिवसांचा दुखवटा'. त्यांच्या नव्वद वर्षाच्या अनुभवातून व नव्या पिढीच्याअडचणी समोर ठेऊन मांडलेला हा विचार आहे, असे दिसते. आपण अनेक रूढी परंपरामध्ये गुरफटलेले आहोत की काळानुरूप त्यात बदल करण्यास मन तयार होत नाही. भावकी मोठी असली की, अनेक सणवार सुतक पडले म्हणून साजरे करता येत नाहीत. काहीवेळा तर एखाद्या व्यक्तीचा 'दिवसाचा'वा तेराव्याचा किंवा श्राद्धाचा कार्यक्रम भावकीतील दुसरं कोणी वारलं की पुढे ढकलावा लागतो. गावात असेच याच कारणामुळे एक कार्यक्रमाच्या वेळी अर्धा स्वयंपाक तयार असताना कार्यक्रम पुढे ढकलावा लागल्याचे मी ऐकले आहे. यात पैसा, वेळ वाया जातो, हे अनेकांच्या



दृष्टीने नात्यां पुढे नगण्य समजले तरी केवळ शेतीवर तीही कोरडवाहू आणि एक – दोन एकरवर कुटुंब चालवणाऱ्यांसाठी क्लेशदायक ठरते. ही मंडळी सामाजिक दबावापोटी विरोध तर सोडा तोंडातून शब्दही काढू शकत नाहीत. या पार्श्वभूमीवर मुक्ता आत्यांची ही इच्छा बदलत्या काळानुरूप सुसंगत वाटते. त्यामुळे गावकऱ्यांनी यापुढे गावात कोणाचेही निधन झाले तर पाच दिवसांत सर्व विधी पूर्ण करण्याचा निर्णयघेतला तर ही आमच्या आत्या आणि देशमुख परिवाराच्या बबई यांना श्रद्धांजली तर ठरेलच पण पुढील पिढीसाठी आदर्श निर्णयही ठरेल. त्यातही बाहेरगावी नोकरी करणाऱ्यांसाठी भावना आणि नोकरी या गुंत्यातून सुटण्या साठी सुसह्य ठरेल.
कारण खाजगी क्षेत्रात सलग १५ दिवस सुट्या मिळणे तसे सोपे नाही. वाढती स्पर्धा आणि बेरोजगारीचा लोंढा नाही तर आता पूर वाढलाय म्हटलं तर वावगं ठरणार नाही. या परिस्थितीत नोकरी मिळणं कठीण झालं आहे. त्याहून जास्त मिळालेली नोकरी टिकवणं अवघड आहे. त्यामुळे असा काही दुःखद प्रसंग आला की नोकरी वा व्यवसाया निमित्त बाहेर पडलेल्या या मंडळींची मोठी अडचण होते. पूर्वी गावच कुणबी होतं, शेती हाच मुख्य व्यवसाय. सारं कुटुंब शेतातच राबायचं. पाऊस काळही चांगला होता.त्यामुळे शिक्षणच प्रमाणही आणि नोकरी करणारेही कमीच. गावातून व्यवसाया निमित्त आमचे काका कै.ड.बाळासाहेब खंदारे आणि नोकरी निमित्त आमचे वडील जीवनराव खंदारे हे दोघेच सर्वप्रथम गावाबाहेर पडणारे होते. पुढे सततचा दुष्काळ, कुटुंब वाढत गेल्याने शेतीची फोड झाली. शेतीवरच अवलंबित्व कमी करणे हाच एकमेव पर्याय राहिला. त्यामुळे शिक्षणाच प्रमाण वाढत गेले आणि गावाची ओळख नोकरदारांचे गाव म्हणून होऊ लागली. वकील, शिक्षक, इंजिनिअर, डॉक्टर, सरकारी नोकर, सैन्यदल तसेच छोटे मोठे उद्योग, व्यवसायात अनेकजण आहेत. आता नव्या पिढीत डॉक्टर आणि इंजिनिअरची संख्या पन्नासच्या वर गेली आहे. ही सगळी नोकरदार आणि व्यावसायिक मंडळी बाहेर पडलेले आहेत. आताच्या स्पर्धेच्या काळात मग ती शिक्षणातील, नोकरी तील वा व्यवसायातील असो या मंडळींना आता पंधरा दिवसांची सुट्टी काढणे तसे सहज शक्य होईल का? याचा विचार प्रामुख्याने गावातील जुन्या ज्येष्ठ मंडळींनी करणे गरजेचे आहे असे वाटते. ही स्थिती केवळ वरपगाव च्या बाहेर पडलेल्या मंडळींची नाही तर ती प्रत्येक गावातून बाहेर पडलेल्यांची आहे. गावात शेती करणारी मंडळीही शिक्षित आहेत. त्यामुळे तेही विचार करतील, आणि दुःखवट्याचे दिवस तीन किंवा पाच दिवसांवर आणतील. याला वेळ लागेल परंतु, गावागावांत या बाबतची जागृती होईल असा विश्वास मला वाटतो. यापूर्वी मी अनेकवेळा झालेल्या चर्चांमध्ये याबाबत माझं मत मांडलं आहे.

तेरा दिवसांचा दुःखवटा का पाळत?

पूर्वीच्या काही रूढी – परंपरा या त्यावेळच्या परिस्थितीतून तयार झालेल्या होत्या.सुतक, तिसरा, दहावा, तेरावा का पाळला जात असे, त्याची कारणमिमांसा अशी असू शकते. पूर्वी संपर्काची तसेच वाहतुकीची साधने नव्हती, एखाद्या व्यक्तीचे निधन झाले की, अंत्यविधीला गावातील लोकच उपस्थित राहू शकत असत. पंचक्रोशी तील आप्तांना हास्ते–परहास्ते निरोप पोचवला जाई. मग पंचक्रोशीतील नातेवाईक, आप्तेष्ट तिसऱ्याला (सावडायला) येत. तिसऱ्या दिवशी सावडण्यामागेही तसेच कारण होते. पूर्वी मुबलक लाकडं वापरली जात, परिणामी राख थंड होण्यासाठी किमान तीन दिवस लागत. त्यामुळे तिसऱ्या दिवशी सावडण्याचा कार्यक्रम असे. पंचक्रोशी बाहेरील नातेवाईकांना खास माणसे पाठऊन निरोप दिला जाई. त्यासाठी घोडे, बैलगाडीचा वापर करावा लागत असे. निरोप मिळेल तसे इतर नातेवाईक येत. त्यात प्रामुख्याने मुली व सुनांचे नातेवाईक असत. त्यामुळे किमान दहा दिवस घरातील मंडळींनी बाहेर जाऊ नये, म्हणून दहा दिवस सुतक पाळले जाई. पूर्वी एकत्र कुटुंबपद्धती तर होतीच पण भावकितही एकोपा होता. त्यामुळे दुःखद घटना घडलेल्या कुटुंबाच्या बैठकीत भावकितील तसेच गावातील मंडळींची दहा दिवस उठबस असे. त्यामागचे आणखी एक कारण म्हणजे येणाऱ्या पाहुण्यांच्या भेटीगाठी होत.अनेक गावांत तर या दहा दिवसांत दुःखी कुटुंबाच्या घरातील चुलही पेटत नव्हती, कारण भावाकितील महिला, रोज जेवण पाठवत असत. तसेच याकाळात भावकित कोणताही आनंदाचा कार्यक्रम किंवा गोडधोड होत नसे. गावातही असे कार्यक्रम टाळले जात असत. दुःखात खऱ्या अर्थाने साथ देण्याची ती पद्धत मानली जात होती. दहाव्या दिवशी अस्थि विसर्जन करून सुतक संपवले जायचे व भावकीतील तसेच गावातील लोक आपल्या नियमित कामाला लागायचे. अनेक गावात मोठ्या नद्या नसल्याने अस्थि विसर्जनसाठीबाहेरगावी जावे लागत असे.(पूर्वी नद्या बारमाही वाहत असत, त्यामुळे विसर्जित केलेल्या अस्थि वाहून जात. त्यामुळे प्रदूषणाचा संबंध येत नसे.) तेथून परतण्यासाठी किमान दोन दिवस जात. तेथून आल्यानंतर गोड जेवणाचा कार्यक्रम करत व दुःखातून बाहेर पडून पुन्हा कामाला लागत. पुढे त्या रूढी परंपरा झाल्या. ज्या आजही पाळल्या जातात.
आता एखादी दुःखद घटना घडली तर काही मिनिटांत पंचक्रोशीतच काय देशात, परदेशात त्याची माहिती पोचते. वाहतुकीची साधनेही उपलब्ध असल्याने जवळचे नातेवाईक शक्यतो अंत्यविधीलाच पोचण्याचा प्रयत्न करतात किंवा पुढील दोन दिवसांत येऊन जातात. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात तसेच खानदेशातील अनेक गावांमध्ये तीन दिवसांत दुखवटा संपवून सर्व कार्यक्रम तिसऱ्या दिवशीच उरकतात. काही गावांत तसे ठराव घेतले गेले आहेत. उद्योग, व्यापार करणाऱ्या अल्प संख्यांक असलेल्या अनेक समाजात तर खूप पूर्वीपासून तीन दिवसांत सर्व कार्यक्रम आटोपण्याची प्रथा आहे. कारण कोणताही व्यवसाय दहा– पंधरा दिवस बंद ठेवणे किती नुकसानदायक ठरू शकतं हे त्यांना माहीत होते. त्यामुळे आपणही पुढच्या पिढीच्या नोकरी नव्या भाषेत 'करिअर', व्यवसायाचा विचार करून त्यांच्यासाठी हा तसा सोपा दिसत असला तरी धाडसी त्यातही जुन्या पिढीचं मन वळवणे अवघड आहे, हे माहीत आहे. असं असलं तरी आपण तीन नाही तरी किमान पाच दिवसाचा निर्णय घ्यावा असे वाटते.

**रणजित खंदारे,**
**ज्येष्ठ स्वतंत्र पत्रकार**

### महाराजांसह कुटुंबियांकडे व्यक्त केली होती इच्छा

कै.मुक्ताबाई अच्युतराव देशमुख यांनी वरपगाव येथील नागेशपुरी मठाचे महंत भगवान महाराज शास्त्री यांच्याकडे तसेच कुटुंबीयांकडे 'माझ्या निधनानंतर पाच दिवसांत सर्व कार्यक्रम उरकावेत त्यानंतर कोणतेही कार्यक्रम करू नयेत,अशी इच्छा बोलून दाखवली होती. त्यांच्या इच्छेनुसार पाच दिवसांचा दुःखवटा पाळण्याचा निर्णय कुटुंबियांनी घेतला.

# नगररोडवर अपघात होऊ नये म्हणून यू-टर्न नाही असे तांत्रिक कारणे सांगणारे अभियंता राजेंद्र भोपळे यांना मोतिबिंदू झालाय का?

## बीड शहरांतर्गत धुळे-सोलापूर महामार्गावरील दुभाजक नसल्याने वाढते अपघात दिसत नाहीत काय? : डॉ. ढवळे

बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगरनाका दरम्यानच्या रस्त्यावर यू-टर्नसाठी दुभाजकात जागा सोडलेली नाही. या मार्गावरच्या उत्तरेकडील बाजूस जिल्हा न्यायालय, तहसील, सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालय तर दक्षिणेकडील बाजूस शासकीय आरोग्य प्रशिक्षण केंद्र, शासकीय विश्रामगृह, पंचायत समिती, चंपावती क्रीडा मंडळ अशी अनेक महत्त्वाची ठिकाणे आहेत. या ठिकाणी जाण्यासाठी नागरिकांना नगरनाका गाठून पावणेकिलोमीटरचा फेरा मारावा लागतो.

यापूर्वी या मार्गावर सहा ठिकाणी यू-टर्नची सोय होती, मात्र यावेळी एकही ठेवण्यात आलेला नाही. सामाजिक कार्यकर्त्यांनी निवेदने दिली, आंदोलने केली, लोकप्रतिनिधींनीही जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठका घेतल्या, स्थानिक दैनिकांनी वारंवार प्रश्न उपस्थित केला तरी राज्य महामार्ग प्राधिकरणाचे अभियंता राजेंद्र भोपळे यांनी अपघात टाळण्यासाठी यू-टर्न नाही असा युक्तिवाद करून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते चहाटा फाटा दरम्यान केवळ तीन ठिकाणी (नगरनाका, धानोरा रोड, कालिका नगर कमान) यू-टर्न दिले आहेत.




परंतु जिल्हाधिकारी कार्यालय किंवा तहसील कार्यालयासमोर यू-टर्न देण्यास तांत्रिक अडचण असल्याचे सांगून त्यांनी असहमती दर्शवली आहे. मग बीड शहरांतर्गत धुळे-सोलापूर महामार्गावरील दुभाजक नसल्याने होत असलेले अपघात त्यांच्या डोळ्यांना दिसत नाहीत का? त्यांना मोतिबिंदू झालाय का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

### बीड शहरांतर्गत धुळे-सोलापूर महामार्गावरील दुभाजक नसल्याने वाढते अपघात चिंताजनक

बीड शहरातून जाणारा धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग बाह्यवळणाद्वारे वळवण्यात आला असला तरी शहरातील १२ किमी रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट आहे. हा रस्ता फक्त दोन लेनचा असल्याने वाहतुकीची कोंडी होते. दुभाजक नसल्याने वाहने कोठूनही वळतात आणि अपघातांचा धोका वाढतो.

या रस्त्याचे चौपदरीकरण मागील सहा वर्षांपासून रखडले आहे. दोन वर्षांपूर्वी मजबुतीकरणाचे काम झाले, पण रस्ता अरुंदच राहिला. फक्त बसस्थानक-महावितरण कार्यालय आणि बसस्थानक-जिल्हा रेशीम कार्यालय दरम्यानच दुभाजक आहेत; उर्वरित रस्त्यावर दुभाजक नाहीत. या मार्गावर तासाभरात हजारो वाहने धावतात – बस, खासगी गाड्या, दुचाकी, रिक्षा, मालवाहू ट्रक. पावसाळ्यात मातीमुळे वाहने घसरतात, राष्ट्रवादी भवन ते बार्शी रोडवर तर जागोजागी खड्डे आहेत. म्हणूनच या मार्गावर तातडीने दुभाजक बसवावेत, सिग्नल व्यवस्था सक्षम करावी, आणि चौपदरीकरणाचे काम त्वरीत सुरू करावे, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.



## बाजीराव चव्हाण यांच्या पुढाकाराने नागरिकांना मोफत छत्रीचे वाटप

बीड । प्रतिनिधी

धाराशिव जिल्ह्यात 'हरित धाराशिव' अभियानाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या 'संकल्प वृक्षारोपण' कार्यक्रमात, पंधरा लक्ष वृक्ष एकादिवसात लावण्याचा उपक्रम, आणि नागरिकांना मोफत छत्री चे वाटप करण्याचा नावीन्य पूर्ण कार्यक्रम धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या पुढाकारातून संपन्न झाला.

या उपक्रमामुळे पावसाळ्यात वृक्षारोपणात सहभागी होणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी कार्यक्रमाला विशेष उपस्थिती अभिनेता स्वप्नील जोशी यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी युवा सेनेचे पदाधिकारी मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख महादेव मातकर, युवा सेना माजी जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, अजय सुरवसे, सरपंच लिंबाजी जाधव, युवानेते सुरज चुंगडे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक युवा सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोफत छत्री वाटपामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, अशा सामाजिक उपक्रमांमुळे जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्यास मदत होत असल्याचे बाजीराव चव्हाण यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## जिल्ह्यातील दिव्यांग व जेष्ठ नागरिकांनी कर्त्रीम अवयव शिबिराचा लाभ घ्यावा : शाहु डोळस

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदार संघातील खासदार बजरंग सोनवणे यांचे संकल्प नेतून बीड मतदार संघातील दिव्यांग, जेष्ठ नागरिक यांना सुविधा मिळवून देण्यासाठी दिनांक १८/७/२०२५ला शिबिराचे उदघाटन खा. बजरंग (बप्पा) सोनवणे यांनी केले आहे. ते ३० जुलै २०२५ पर्यंत चालणार आहे. यामध्ये दिव्यांगासाठी जयपुरी फूट, कृत्रिम हात, कालिपर, व्हीलचेअर, ड्रायशिकल, क्रचेसं, वाकिंग स्टिक, अंधासाठी बेलकीत, स्मार्ट फोन, काठ्या, चस्मे, जेष्ठ नागरिकांसाठी करत्रिम दात, खुबड, कृत्रिम अवयव, श्रवण यंत्र, व्हील केअर कमोडसहित, सिलीकोण, खोम तकीया, निब्रेस स्पयनल सपोर्ट, सरवायकल कॉलर, कानची मशीन ह्या सर्व साहित्यासाठी दिव्यांग व जेष्ठ नागरिकांनी आपल्या पंचायत समिती येथे आपली योग्य तपासणी करून आपण जे अवयव निश्चित करावे तरी बीड जिल्ह्यातील दिव्यांग व जेष्ठ नागरिकांनी सकाळी १०ते सायंकाळी ६ पर्यंत उपस्थित राहून संधीचा फायदा घ्यावा.



२१ जुलै २०२५ बीड, २२ जुलै २०२५ माजलगाव, २३ जुलै २०२५ पाटोदा, २४ जुलै २०२५ वडवणी, २५ जुलै २०२५ आस्टी, २६ जुलै २०२५ धारूर, २८ जुलै २०२५ परळी वै, २९ जुलै २०२५ शिरूर का, ३० जुलै २०२५ गेवराई वरील तखेला दिव्यांगणी दिव्यांग प्रमाणपत्र, णऊखऊ कार्ड, आधार कार्ड उत्पनचे प्रमाणपत्र, राशन कार्ड, तसेच जेष्ठ नागरिकांसाठी आधार कार्ड, उत्पन्न १,८०,००० च्या आत घ्यावे, तरी बीड जिल्ह्यातील दिव्यांग व जेष्ठ नागरिकांनी या शिबिराचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा असे आवाहन रिपाई दिव्यांग आघाडी जिल्हा बीड चे जिल्हाध्यक्ष शाहु डोळस यांनी केले आहे.



## पिंपरखेडमध्ये विठ्ठल बिरदेव यात्रा मोठ्या प्रमाणात संपन्न

### खंडोबा मंदिराच्या परिसरात भाविक भक्तांनी घेतला आनंद

बीड । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील पिंपरखेड गावामध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विठ्ठल बिरुदेव यात्रा परस कार्यक्रमाचे आयोजन समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले. याप्रसंगी गावातून भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी पोटावर तलवार मारून घेणे काटी खेळणे इत्यादी धाडसी खेळाचे सादरीकरण झाले. यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी यात्रेचा आनंद घेतला.

## धारूरमध्ये 'जागृती युनिट' स्थापन जनजागृतीसह लोक अदालतीवर भर

धारूर । प्रतिनिधी

तालुका विधी सेवा समिती, धारूर यांच्या निर्देशानुसार धारूर येथे 'जागृती युनिट' ची स्थापना करण्यात आली आहे. या युनिटच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांविषयी माहिती देण्यासाठी तसेच भावी योजनांवर चर्चा करण्यासाठी शुक्रवार, दिनांक १८ जुलै २०२५ रोजी दुपारी २.१० वाजता दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर येथे एका महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



या बैठकीला (एम.एम. वालुजे), दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, धारूर यांच्यासह अनेक प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यात तहसिलदार, धारूर; गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारूर; पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, धारूर/पिंपळदरा/सिरसाळा; सब पोस्ट मास्तर, डाक कार्यालय, धारूर; म.रा.म.पा.म. बीड विभाग, आगार कार्यालय, धारूर, ॲडव्होकेट संघ प्रतिनिधी; सर्व विधी दूत, तालुका विधी सेवा समिती, धारूर; शाखाधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा – बाजारपेठ/तेलगाव रोड; आणि किल्ले धारूर नगरपरिषद प्रतिनिधी यांचा समावेश होता.

बैठकीत 'जागृती युनिट' द्वारे करण्यात येणाऱ्या विविध कामांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक कार्यालयाने आपापल्या स्तरावर जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करावे, असे यावेळी ठरविण्यात आले. याव्यतिरिक्त, आगामी १३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या लोक अदालतीविषयी माहिती देण्यात आली आणि नागरिकांना त्यांची प्रकरणे या लोक अदालतीमध्ये सामोपचाराने सोडवून घेण्याचे आवाहन करण्यात आले. या महत्त्वपूर्ण बैठकीला वकील संघाचे अध्यक्ष आणि मोठ्या संख्येने वकील उपस्थित होते. (एम.एम. वालुजे), दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, धारूर यांनी 'जागृती युनिट' आणि लोक अदालतीसारख्या उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.



सामाजिक कार्यकर्त्या मयुरी ताई बांगर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांना बीड येथे आल्यानंतर स्वागत करून सामाजिक विषयावरती चर्चा केली.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी विक्रांत कांबळे यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

अनिल (राधे) कांबळे मित्रमंडळ आयोजित साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त मित्र मंडळाच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी विक्रांत कांबळे संयोजक रोहित भिसे, उपाध्यक्ष संकेत कांबळे, सचिव शाम कांबळे, सहसचिव मनोज गायकवाड, कोषाध्यक्ष युवराज कांबळे, सकोषाध्यक्ष शुभम भिसे, सदस्य प्रदीप कांबळे, परविन कांबळे, सुहास क्षीरसागर, मयूर कांबळे यांची निवड करण्यात आली आहे.



माजलगाव शहरातील संभाजी महाराज चौक येथे मागील नऊ वर्षापासून अनिल (राधे) कांबळे मित्र मंडळाच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक अनिल राधे कांबळे हे असतात तर अनेक समाज उपयोगी उपक्रम राबवले जातात यामध्ये रक्तदान शिबीर घेण्यात येते, गरजूंना विविध फळे व अन्नधान्य, गृहोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात येते तसेच समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम घेतले जातात. यावर्षी शीतल साठे, नवयान महाजलसा यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या निमित्ताने माजलगाव शहरामध्ये भव्य मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आलेले आहे तसेच भव्य मिरवणूक निघणार असून या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन अनिल राधे कांबळे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. या निमित्ताने माजलगाव शहरामध्ये भव्य मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आलेले आहे तसेच भव्य मिरवणूक निघणार असून या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन अनिल राधे कांबळे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



पंचायत समिती सदस्य प्रा.शाम कुंड यांनी दैनिक आरंभ चे पत्रकार सुमेध करडे यांच्या निवास स्थानी येऊन वाढदिवसाच्या निमित्ताने का. गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? हे पुस्तक भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

## अरुण कांबळे यांना पीएचडी

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील शिंदी येथील मूळ रहिवासी तथा छत्रपती संभाजी नगर येथील जयभवानी विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे उप मुख्याध्यापक अरुण लक्ष्मणराव कांबळे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने 'महात्मा फुले – डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचारधारा' या विषयात पीएचडी पदवी प्रदान केली.डॉ. डी.व्ही.शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर व अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन: एक अभ्यास (१९२० ते १९७०)' या विषयावर त्यांनी शोध प्रबंध सादर केला आहे.



अरुण कांबळे हे गेल्या ३३ वर्षापासून इंग्रजी विषयाचे अध्यापन करत आहेत. ते इंग्रजी विषयाचे राज्यस्तरीय तज्ञ मार्गदर्शक, लसाकम या सामाजिक संघटनेचे राज्य प्रवक्ते आहेत. त्यांचा अनिगुत काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे.मासिक लहूशक्ती, मासिक तथागतचे त्यांनी अनेक वर्ष संपादन केले आहे. विविध विषयांवर अनेक वर्तमानपत्रातून त्यांचे लेख प्रकाशित झाले आहेत. स्काऊट गाईड चळवळीच्या माध्यमातून आय.एस.टी.म्हणून ते जपान येथे २३ व्या आंतरराष्ट्रीय जांबोरी त सहभागी झाले होते. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात त्यांचे भरीव योगदान आहे. दि.२६ जून रोजी नुकतेच त्यांना राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

त्यांच्या या यशाबद्दल जय तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. नामदेवराव गाडेकर, सचिव रंगनाथराव जाधव, सदस्य शिवाजी देवरे, प्राचार्य डी.एस. जाधव, पर्यवेक्षिका बी.एस.हिवरेकर, प्रो.डॉ.दिलीप अर्जुने, प्रो.डॉ.सुनिल नरवडे, डॉ.एम.जी.सदामते, प्राचार्य कमलाकर कांबळे, प्राचार्य बी.जी. खोडवे, प्राचार्य ए.के. वाघ, एन.एम.राठोड, एस.पि.चेपट, ए.बी. जाधव, एम.एस.रांजणीकर, किशोर गेडाम, एन.जे.पठाण, मधुसूदन कांडलिकर, सुशील कुंबेफळकर, डॉ.गणेश गावंडे, प्रा.डॉ.मारोती गायकवाड, के.ई. हरिदास, माजी न्या.डी. आर.शेळके, श्रावणदादा गायकवाड, डॉ.भारत सोनवणे, प्रा.अरुण चंदनशिवे, ॲड.वसंत शेजुळ आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## स्वामी विवेकानंद विद्या मंदिर शाळेमध्ये गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ

### शिष्यवृत्तीधारक, बाल वैज्ञानिक व ऑलंपियाड राज्यस्तरीय परीक्षेतील मोमेंटो, गोल्ड मेडल व सिल्वर मेडल प्राप्त ७५ विद्यार्थ्यांचा सत्कार

केज । प्रतिनिधी

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४ –२५ वर्षातील विविध स्पर्धा परीक्षेमध्ये नेत्रदीपक यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जीवन विकास शिक्षणमंडळाचे सचिव जी.बी.गदळे, प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, तर प्रमुख उपस्थिती म्हणून जीवन विकास शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, ज्येष्ठ शिक्षक अजय देशपांडे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे आदी उपस्थित होते.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेतील सहशिक्षक तसेच एम.टी.एस. ऑलंपियाड समन्वयक बी.एम.टिंगरे यांनी केले याप्रसंगी ते म्हणाले की, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेचा आलेख केवळ गुणात्मक नव्हे तर संख्यात्मक ही वाढत आहे. यावर्षी इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये एकूण पाच विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक झाले आहेत. डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेमध्ये एकूण तीन विद्यार्थी दुसऱ्या लेव्हल साठी पात्र ठरले आहेत. महाराष्ट्र टॅलेंट सर्च राज्यस्तरीय परीक्षेमध्ये शाळेतील मुंडे आर्यन अंगद इयत्ता सातवी मधून राज्यातून सर्व प्रथम आला आहे. तर एम.टी.एस.ऑलंपियाड परीक्षेमध्ये इयत्ता आठवीतून यादव हिंदवी विष्णू राज्यातून सर्वतृतीय आली आहे. स्पेशल मोमेंटो प्राप्त ३ विद्यार्थी, गोल्ड मेडल प्राप्त २१ विद्यार्थी, सिल्वर मेडल प्राप्त ३६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

याप्रसंगी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष जी. बी.गदळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षेतूनही आपले करिअर घडवले पाहिजे. त्या दृष्टिकोनातून यशस्वी वाटचाल केली पाहिजे. यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांच्या यशामध्ये विद्यार्थ्यांचा पाया घडविणाऱ्या शिक्षकांचे योगदान फार महत्त्वाचे असते. शेवटी त्यांनी सर्व स्पर्धा परीक्षे तील गुणवंतविद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचेही अभिनंदन केले.

आठवी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी– यादव हिंदवी विष्णू, मोरलवार कैवल्य गणेश, जगदाळे श्रेयस किरण, चव्हाण अक्षरा सुंदर, यादव पार्थ विष्णू इत्यादी. डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षा– भिसे अभिनव श्रीहरी, सांजुरे आकांक्षा दिपक, लटपटे आर्या राजेंद्र इत्यादी. महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा– मुंडे आर्यन अंगद राज्यातून सर्वप्रथम,चाटे ओंकार सूर्यकांत केंद्रातून सर्वद्वितीय इत्यादी. एम.टी.एस.ऑलंपियाड राज्यस्तरीय परीक्षा– यादव हिंदवी विष्णू राज्यातून सर्वतृतीय, मोरलवार कैवल्य गणेश जिल्ह्यातून सर्व द्वितीय, लटपटे आर्या राजेंद्र जिल्ह्यातून सहावी हे विद्यार्थी स्पेशल मोमेंटो साठी पात्र ठरले आहेत. एम.टी.एस. ऑलंपियाड गोल्ड मेडल प्राप्त विद्यार्थी– काकडे अनुष्का बाबासाहेब, चौरे सोहम लक्ष्मण, डोईफोडे आदित्य राजाभाऊ, कांबळे जयराज हरिभाऊ, मोरे संस्कृती दत्ता, खरमाटे सत्यानंद मेघराज, काळे शौर्य सागर, चाटे रोहन संतोष, घोळवे गुंजन धनंजय, कापरे अथर्व अंकुश,जाधव संस्कृती भारत, शेळके हर्षदा संजय, घोडके शिवम संतोष, ठोंबरे श्रेयश श्रीधर, बावगे वेदांत महादेव, देशमुख गौरी गणेश, शेटे सक्षम मिलिंद, ढोबळे प्राची युवराज, क्षीरसागर सिद्धी सचिन इत्यादी.

एम.टी.एस.ऑलंपियाड सिल्वर मेडल प्राप्त विद्यार्थी– रणवीर रविंद्र मुंडे, अनुष्का आश्रुबा नागरगोजे, प्रणव स्वप्नील वाघमारे, अपूर्वा उत्तरेश्वर सोनवणे, आरती बिबिशन चाटे, सौम्या सचिदानंद ढेपे, संस्कृती रणजितकेदार, अमृता नरसिंग शिंदे, अंजली लक्ष्मण चौरे, आर्या अशोक खोगरे, तनुजा संतोषकुमार बियाणी, श्रेया प्रविण मैंद्रे, अथर्व बाबू इंगोले, रुपाली शिवराज लांब, शिवभक्ती प्रेमानंद स्वामी, रसिका शाहूराव कुलकर्णी, शिवानी शिवराज जाधव, आरती वैजनाथ राऊत, अंकिता संतोष चौरे, आर्या बालाजी शेटे, समर्थ प्रशांत चौरे, विक्रांत महादेव चौगुले, आरव दिपक कांबळे, तनुजा शिवराम राऊत, श्रेया पांडुरंग घाटुळे, दुर्गेश सचिन जोगदंड, श्रेया विनोद गुंड, श्रावणी सचिन मुळे, प्रतिक रामेश्वर डोईफोडे, पवन जयदेव चौरे, अक्षरा विकास नेहरकर, आर्या रमेश डोईफोडे, राजेश अशोक साखरे, प्रथमेश चंद्रकांत पाळवदे, वैभव अंगद ससाणे, सोनाक्षी किशोर दुनघव, भिसे श्रेया श्रीहरी, काकडे अथर्व विजय, कदम कार्तिक सुरेश. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले. तर आभार कल्याण आदमाने यांनी मानले.

# वडवणी ते थेटेगव्हण हा रस्ता आहे की मृत्युचा सापळा

## दादा एकदा ह्या रस्त्यावरुन जाऊन बघा; रस्त्याला कधी मुहूर्त लागणार; रस्त्याला आले तलावाचे स्वरूप

वडवणी । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून वडवणी ते थेटेगव्हण ह्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. सध्या केंद्रात व राज्यात महायुतीची सत्ता आहे व या मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके हे पण महायुतीचे आहेत व अर्थमंत्री व पालकमंत्री ही त्यांच्याच पक्षाचे आहे मग कुठं घोडं आडलं हेच कळेनासे झाले आहे. सरकार रस्त्यावर कोट्यवधी रुपये खर्च करत आहे मग या रस्त्यावरच का निधी पडत नाही हा असा प्रश्न पडतो.

वडवणी ते थेटेगव्हण हा १४ किलोमिटर व दोन तालुक्याला जोडणारा महत्त्वाचा रस्ता सध्या अक्षरशः मृत्यूचा सापळा ठरत आहे. रस्त्याची झालेली अत्यंत दुरवस्था ठिकठिकाणी पडलेले मोठे खड्डे, उखडलेला डांबर आणि मुसळधार पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचले असून या रस्त्याचे तलावात रूपांतरित झाले आहे. रस्त्यावर पडलेले खोल खड्डे आता पाण्याने भरले असून वाहनचालकांना खड्डे ओळखणेही कठीण झाले आहे. परिणामी अनेक अपघात घडत आहेत. दुचाकीस्वार तर दररोज संकट ओढवून घेत आहेत. या रस्त्यावरून प्रवास करणं म्हणजे मृत्यूशी खेळ करण्यासारखं आहे. नागरिकांच्या जिवाशी खेळ सुरू आहे. आ.प्रकाश दादा सोळंके तुम्ही एकदा ह्या रस्त्यावरून जाऊन बघा काय असतो त्रास. धारुर व वडवणी या दोन तालुक्यांना जोडणारा हा मुख्य रस्ता असल्याने या मार्गावरून दररोज शेकडो दुचाकी, चारचाकी वाहनधारक, शाळकरी मुले व वृद्ध नागरिक प्रवास करतात. मात्र, रस्त्याची अवस्था इतकी वाईट आहे की एखादा मोठा अपघात कधी घडेल याची खात्री नाही. अनेक ठिकाणी खड्ड्यांमुळे वाहने उलटण्याचे प्रकारही घडले आहेत.

या परिसरातील ग्रामस्थांनी अनेक वेळा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींकडे रस्त्याची मागणी करुन निवेदन दिले आहे. थेटेगव्हण येथे रास्तारोको केला मात्र आश्वासनांपलीकडे काहीच हाती आलेले नाही त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. शासन आणि लोकप्रतिनिधींनी झोपेतून जागे होऊन हा रस्ता तातडीने मंजूर करून निधी उपलब्ध करावा अन्यथा येत्या काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा या परिसरातील गावकऱ्यांनी दिला आहे.



### रस्त्यासाठी रस्तारोको आंदोलन केले

वडवणी ते थेटेगव्हण या रस्त्यासाठी गेल्या काही महिन्याभरापूर्वी डोंगरपट्ट्यातील ग्रामस्थांनी थेटेगव्हण फाटा येथे रास्तारोको आंदोलन केले. या परिसरातील सामाजिक, राजकीय कार्यकर्ते यांच्यावर प्रशासनाने गुन्हे दाखल केले पण ह्या रस्त्यासाठी ठोस असा निर्णय काही झालेला दिसत नाही.

### आ.प्रकाश दादा सोळंके यांचे दुर्लक्ष

माजलगाव मतदारसंघाचे आ.प्रकाश दादा सोळंके हे गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. यांच्या लक्षात ही रस्त्याची समस्या वारंवार आणून दिली गेली आहे. स्थानिक ग्रामस्थ, युवक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत. निवडणुकीच्या काळात विकासाच्या गप्पा मारुन आश्वासनांचा पाऊस पडतो पण निवडून आल्यानंतर कोणी फिरकतही नाही. आ.प्रकाश दादा सोळंके प्रत्यक्षात मात्र गावोगावच्या समस्या दुर्लक्षित करत असल्याचा आरोप या परिसरातील ग्रामस्थ करत आहेत.

### किती अपघात झाल्यावर जाग येणार?

गेल्या काही वर्षांत या रस्त्यावर अनेक अपघात झाले असून काही नागरिकांना गंभीर दुखापत झाली आहे. दुचाकीस्वारांसाठी तर हा रस्ता जीवघेणा ठरत आहे. पावसाच्या पाण्याने खड्डे भरले जात असल्याने अपघातांची शक्यता आणखी वाढली आहे. स्थानिकांनी वारंवार रस्त्याची मागणी केली आहे. मात्र आमदार प्रकाश सोळंके यांनी या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी दोघेही ठोस पावले उचलण्यास अपयशी ठरले आहेत. मग किती अपघात झाल्यावर व आणखी किती जणांचा जिव गेल्यावर जाग येणार असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत.

### विरोधी पक्षाची भूमिका ही संशयास्पद

सध्या महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आहे परंतु या सरकारमध्ये विरोधात भूमिका बजावण्यासाठी विरोधीपक्षनेता नाही केवळ सत्ताधाऱ्यांवर टीका, जनतेच्या वेदनेवर मात्र मौन अशीच अवस्था या रस्त्यासाठी महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांची झाली आहे. आमच्या हक्कासाठी कोणी उभं राहणार की नाही? विरोधी पक्ष रस्त्यावर कधी उतरणार? कधी आंदोलन करणार असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत. विरोधात बोलण्यास कोणीही तयार नसल्याने विरोधी पक्षाची भूमिका ही संशयास्पद असल्याची दिसत आहे.



# सिरसाळा ते सोनपेठ रोडवर वसंतपूर तांडा येथे मोटरसायकलस्वार तीन चाकी आप्पे ऑटोला दिली धडक

सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा ते सोनपेठ रोडवरील मोटरसायकल व पॅसेंजर आप्पे ऑटो व चक्र४४.-ऊ ३८४३ या नबरं गाडी ट्विलर पल्सर या दोन्ही वाहनाची समोरासमोर धडक बसल्याने सिरसाळा ते सोनपेठकडे जात असताना वसंतपूर तांडा येथे एका मोटरसायकल स्वराने जोरदार धडक बसल्याने मोटर सायकल स्वार जखमी अवस्थेत दिसून आला त्याच वेळी सिरसाळ्याचे मा. सरपंच रामदादा किरवले यांनी १०८ वर कॉल करुन व सिरसाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे यांना फोनवरून माहिती दिली व म्बुलन्स गाडी लागलीच त्या अपघाता ठिकाणी येऊन त्या एक व्यक्तीस जखमी असलेल्या युवकास अंबाजोगाई वैद्यकीय दवाखाना येथे पाठवण्यात आले आहे.राम किरवले हे सोनपेठ येथील एका मंगल परिणय सोहळ्या हून यत असताना अचानक अपघात झालेला दिसून आला व त्याने गाडीच्या खाली उतरून सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आपले प्रयत्न चालू केले.

सिरसाळा मा.सरपंच राम किरवले हे वेळेला महत्व देणार व्यक्तिमत्व आहे. त्यांनी पुढील उपचारांसाठी अंबाजोगाई वैद्यकीय दवाखाना येथे हलविण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस शेगुळे व पोलिस घोळवे करत आहेत.

# खड्डा झाला पालकमंत्री तर बाकी खड्डे पालकमंत्र्याची पिलावळं

## नवं पर्वाची थीम घेऊन मिरवणाऱ्यांना बारामती दाखवा : उल्हास गिराम

बीड । प्रतिनिधी

बीड शहर मरणयातना भोगत आहे. उघडे रोहित्र, उघड्या नाल्या, सर्वत्र खड्डे, कचऱ्याचे ढिगारे, शहरवासियांच्या पिण्याच्या पाण्याचं नियोजन या सारख्या शेकडो समस्या म्हणजे शहरवासियासाठी मरणयातनाचं, पालकमंत्री म्हणून अजितदादा पवार आपण लक्ष घाला, बारामती जशी महाराष्ट्रासाठी आयडॉल आहे तसे बीड करा, बीड मध्ये नवं पर्वाची थीम घेऊन मिरवणाऱ्यानां आपली बारामती दाखवा. दादा आपणाकडुन शहरवासियांच्या खुप अपेक्षा आहेत याला तडा जाऊ देऊ नका. आज शिवसैनिकांनी एका खड्ड्याचे नमकरण पालकमंत्री केले तर बाकी खड्डे पालकमंत्र्याची लाभार्थी पिलावळं असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.

आज बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस या मार्गांवर असणाऱ्या खड्ड्या संदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आंदोलन निदर्शने करण्यात आली. या मार्गावरील मुख्य खड्ड्याला पालकमंत्री खड्डा असे नाव देऊन खड्ड्याचे नामकरण करण्यात आले, तर बाकी छोटी - मोठी खड्डे पालकमंत्र्याची लाभार्थी पिलावळे असल्याचे शिवसैनिकांनी जाहीर केले. खड्ड्यात पालकमंत्र्याची प्रतिमा ठेऊन गुलाल बुक्का व हार घालून, ढोल तशे वाजवून जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी लक्षावेधी आंदोनल केले.

बीड शहरातील प्रमुख रस्ता म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस हा होय, या मार्गांवर आज शेकडो खड्डे आहेत. या मार्गांवर नगर पालिका आहे, जिल्हा परिषद आहे. याच मार्गे विध्यार्थी शाळा-महाविद्यालयात जातात, जिल्हा रुग्णालयात नागरिक जातात, ग्रामीण भागातील शेतकरी आपला भाजीपाला घेऊन याच मार्गे बाजारपेठेत जातात, स्थानिक व्यापारी याच मार्गांवर आपले व्यवसाय करतात. अजितदादा आपण पालकमंत्री आहात, आपण एकदा शहरात फिरून सर्वे करावा म्हणजे शहरवासीयांच्या समस्या लक्षात येतील. आपणा पुढे नवपर्वाची थीम घेऊन मिरवणाऱ्या पिलावळीनां थोडी समाज द्या, त्यांना आपली बारामती फिरून दाखवा, बीड ची भानामती होऊ देऊन नका असे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले. यावेळी महिला संघटिका मीराताई नवले, उपजिल्हाप्रमुख संजय महाद्वार, उपजिल्हाप्रमुख राजुभाऊ महुवाले, रतन तात्या गुजर, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, नवनाथ प्रभाळे, थिगळे विशाल, गणेश लोणकर, विनोद गोरख, जगदीश गिराम, प्रदीप कोठुळे, सतीश सिंह परदेशी, शरद पवार, दिलीप पवार, मच्छिंद्र काळे, चंदूनाना कागदे, प्रेम ताकतोडे, बळी कोटुळे, विशाल तांबे आदी शिवसैनिक मोठया संख्येने उपस्थित होते.



# अवैध रिक्षा चालकांवर जिल्हा वाहतुक शाखेची मोठी कारवाई

## कारवाईत ४० रिक्षा ताब्यात; ३० हजार रुपयांचा ठोठावला दंड

बीड । प्रतिनिधी

सध्या अवैध वाहतुक करणार्यांना बीड पोलीसांचा चांगलाच धाक बसला असून कोणत्याही वाहनचालकाने वाहतुकीचे नियम धाब्यावर बसू नयेत अन्यथा कारवाई अटळ आहे, असा इशाराच जणू पोलीस अधिक्षक नवनीत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन यांनी व जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष, पोलीस उपनिरीक्षक विजय यांनी अवैध वाहतुक करणार्यांना दिला आहे. ज्याचाच भाग म्हणून काल दि.१९ जुलै २०२५ शनिवार रोजी सकाळपासून दिवसाअखेरपर्यंत ४० अवैध रिक्षा ताब्यात घेवून ३० हजार रुपयांचा रोख दंड ठोठावला आहे. यामुळे रिक्षाचालकांसह वाहतुकीचे नियम मोडणार्या सर्वांवर याचा जरब बसला आहे.

बीड जिल्ह्यासह बीड शहरात दिवसभरात १० हजाराच्या वर वाहने ये-जा करत असतात. त्यात रिक्षांची संख्या भली मोठी आहे असे अनेक रिक्षाचालक विनाकागदपत्रे रिक्षा चालवतात यांच्याकडे कागदपत्रे परिपुर्ण स्वरुपात आहेत की नाही याची शहानिशा करण्यासाठी जिल्हा वाहतुक शाखेचे पो.उप.नि विजय यांनी व त्यांच्या टीमने सकाळी १० वाजल्यापासून रिक्षाचालकांची कागदपत्रांची वाहतुक शाखेकडून कागदपत्रे पाहण्यास सुरुवात केली. यामध्ये अनेक रिक्षाचालकांकडे लायसन्स, इन्शुरन्स व गाडीचे कागदपत्र नव्हते त्यामुळे ४० रिक्षांवर कारवाई करण्यात आली व रोख ३० हजार रुपये दंड वसुल करण्यात आला. तरी जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष यांनी रिक्षा चालकांसह सर्व वाहनधारकांनी आपले वाहनाचे कागदपत्रे, इन्शुरन्स, आरसीबुक, पीयुसी, ड्रायव्हींग लायसन्स परिपुर्ण करुन जवळ ठेवण्याचे व वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

या मोहीमेत जिल्हा वाहतुक शाखेचे पो.उप.नि.विजय, सोबत पोलीस हवालदार त्रिंबक, ज्ञानेश्वर, राजाभाऊ, पोलीस अंमलदार वसीम, सिद्धार्थ, चिंतामणी, पोलीस नाईक अजिनाथ इत्यादींनी मोहीमेमध्ये सहभाग घेतला.





# खामगाव येथे लंपी चर्मरोग प्रतिबंधात्मक लसीकरण प्रतेक गावात मोहीम चालु

सिरसाळा । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील सिरसाळा परिसरात पशुवैद्यकीय त्यांच्या माध्यमातून प्रत्येक गावात लंपी चर्मरोग प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात आले आहे. लसीकरणासाठी डॉ.पी.एल. आघाव, पशुधन विकास अधिकारी सिरसाळा संदीप देवकते, काळे, महेंद्र उजगरे गावातील शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात यावेळी उपस्थित होते.

यावेळी सिरसाळा परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांना लंपी चर्मरोग यासाठी शेतकरी बांधवांनी पशुवैद्यकीय अधिकारी आपल्या प्रत्येक गावामध्ये भेट देणार आहेत तरी शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती पशु वैद्यकीय अधिकारी डॉ.पी.एल. आघाव यांनी केली आहे.

# गेवराई चे नगरपरिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम मांडुरके यांची हिटलरशाही : शेख युनूस

बीड । प्रतिनिधी



बीड जिल्ह्यातील तालुका गेवराई येथे काल शास्त्री चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी गोरगरिबांची दुकाने तोडण्यात आली. विक्रम मांडूरके यांनी नोटीस किंवा पूर्व सूचना न देता अतिक्रमण धारक व्यवसायिकांवर धडक कारवाई केली. मात्र एकाला एक आणि दुसऱ्याला वेगळी वागणूक विक्रम मांडुरके यांच्याकडून देण्यात आलेली आहे. मोठ्या व्यवसायिकांची दुकाने न तोडता गोरगरीब जनतेच्या पोटावर पाय दिलेले आहे. गोरगरिबाचे दुकाने मोडून त्यांचे सर्व सामान जेसीबीद्वारे ट्रॅक्टर मध्ये भरून नेण्यात आले. जिल्हाधिकारी बीड जिल्ह्यात अधिकारी मनमानी करत आहेत आपण यावर लक्ष घालावे हीच अपेक्षा जनतेकडून आहे.

# ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळीत भाजपचा सामाजिक सेवा सप्ताह

## २१ ते २७ जुलै दरम्यान विविध सामाजिक उपक्रम; सेवा सप्ताहाचे उद्या उदघाटन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल, पशुसंवर्धन,मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित २१ ते २६ जुलै दरम्यान शहरात सामाजिक सेवा सप्ताह राबविण्यात येणार असून या अंतर्गत विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे उदघाटन उद्या सोमवारी होत असून सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे यांनी केले आहे. २१ तारखेला सकाळी ११ वा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या अरुणोदय मार्केट मधील संपर्क कार्यालयात सेवा सप्ताहातील उपक्रमांचे उदघाटन होणार आहे.

असा असणार सामाजिक सेवा सप्ताह

२१ ते २७ जुलै - आधार कार्ड अपडेट, प्रधानमंत्री आवास योजना, अर्बन २.० घरकुल नोंदणी बारा बलुतेदारांसाठी विश्वकर्मा योजना नोंदणी स्थळ : पंकजाताई यांचे संपर्क कार्यालय, परळी वै., ऊसतोड कामगार महिलांची आरोग्य तपासणी- स्थळ : उपजिल्हा रुग्णालय, मंगळवार २२ - रक्तदान शिबीर सकाळी ९ ते दुपारी ५ पर्यंत पंकजाताई यांचे संपर्क कार्यालय, बोधीवृक्ष वृक्षारोपण स.९.३० वा. स्थळ : भिमवाडी, स.१०.३० वा. स्थळ : हनुमान नगर, बुधवार २३ जुलै - सकाळी ९ वा. छत्री वाटप व कापडी पिशवी वाटप, सकाळी ११ वा., वह्या वाटप स.११.३० वा. माध्य. आश्रम शाळा, शिवाजी नगर, व१२ वा. विलाल उर्दू प्रा. शाळा,



हमालवाडी येथे गुरुवार २४ जुलै - नेत्र तपासणी व मोतीबिंदु शस्त्रक्रिया मोफत आरोग्य तपासणी रक्त तपासणी, बीपी, ईसिजी, शुगर, कोलेस्ट्रॉल मोफत तपासणी वेळ : सकाळी १० ते दु. ५ स्थळ: उपजिल्हा रुग्णालय, परळी, चित्रकला स्पर्धा वेळ स.९ वा.स्थळ : जिजामाता उद्यान,

युवकांसाठी स्पर्धा परिक्षा करिअर व्यक्तिमत्व विकास मार्गदर्शन शिबीर ड. राहुल नावंदर (छत्रपती संभाजीनगर) वेळ : सकाळी ११ वा. स्थळ : वैद्यनाथ महाविद्यालय, परळी वै. शुक्रवार दि.२५ जुलै २०२५: ना. ताईसाहेबांच्या दिर्घायुष्यासाठी होम हवन, निवासी विद्यार्थ्यांसाठी भोजन स्थळ: आर्य समाज गुरुकुल, नंदागौळ रोड. सकाळी ९ वा.शालेय विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व वह्या वाटप स्थळ : वेळ सकाळी १०.३० सरस्वती विद्यालय, परळी वै. जिल्हा परिषद शाळा, परळी वैजनाथ. वेळ सकाळी ११. शनिवार दि. २६ जुलै २०२५ सकाळी ७ वा. श्री वैद्यनाथ प्रभुस अभिषेक स्थळ पंचम ज्योर्तिलिंग श्री वैद्यनाथ मंदिर, परळी वै., सकाळी ७.३० वा. श्री शनैश्वर मंदिर येथे महाआरती स्थळ : श्री वैद्यनाथ मंदिर पायथ्याशी, परळी वै. सकाळी ८ वा. सुगंधकुटी बौध्द विहार येथे बुध्दवंदना स्थळ : भिमनगर, परळी वै. सकाळी ८.३० वा. हुसेन शहावली दर्गा चादर चढवणे स्थळ: बंगला गल्ली, परळी वै. सकाळी ९ वा. अन्नपूर्णा देवी महाआरती स्थळ: श्रीरामदत्त मंदिर (बालाजी मंदिर), परळी वै.सकाळी १० वा. रुग्णाना फळे वाटप- स्थळ उपजिल्हा रुग्णालय, परळी वैजनाथ सकाळी ११ वा. महिला स्वच्छता कर्मचारी सन्मान स्थळ पंकजाताई संपर्क कार्यालय, परळी वै.सकाळी ११.३० वा. सुकन्या समृध्दी योजना नोंदणी स्थळ : पंकजाताई संपर्क कार्यालय, परळी वै. सकाळी १२ वा. शालेय विद्यार्थ्यांना ड्रेस/वही वाटप स्थळ : वैद्यनाथ शाळा/ज्ञानबोधिनी शाळा, गणेशपार, परळी वै. रविवार दि.२७ जुलै २०२५ सकाळी ११ ते दुपारी कॅन्सर रोग निदान शिबीरतज्ञ डॉक्टर्स डॉ. शैलेष अग्रवाल (तोंड व घसा कर्करोग तज्ञ, छत्रपती संभाजीनगर), डॉ. उत्पल गायकवाड (रेडियेशन कर्करोग तज्ञ छत्रपती संभाजीनगर), डॉ. केतन शिरसाट, (मेडिकल ऑनकोलॉजिस्ट, छत्रपती संभाजीनगर) स्थळ : वेदांत होमिओ क्लिनीक, नाथ रोड, औद्योगिक वसाहत कॉम्प्लेक्स, परळी. भविष्याची दिशा युवा शक्तिचा सन्मान ग्रामीण तरुणांचे भविष्य, समस्या, संधी आणि संघर्ष प्रमुख वक्ते विलास बडे सहाय्यक संपादक, न्युज १८ लोकमत वेळ सकाळी ११ वा. स्थळ : लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर, परळी वैजनाथ या सामाजिक सेवा सप्ताहात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे यांनी केले आहे.




# पोटखराब जमिनींना लागवडी योग्य घोषित करा; वंचित बहुजन आघाडीचा प्रशासनाला अल्टिमेटम : सरवदे

पाटोदा । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने दिनांक २६ जून २०२५ रोजी पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी व तहसीलदार कार्यालयासमोर विविध मागण्यांच्या अनुषंगाने जागरण-गोंधळ आंदोलन करण्यात आले होते. यावेळी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत काही समित्यांची स्थापना व पत्रव्यवहार केल्याचे सांगितले होते. मात्र आजतागायत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने प्रशासनाला अंतिम इशारा देण्यासाठी २४ जुलै २०२५ पासून पाटोदा तहसील कार्यालयासमोर अमरण उपोषण सुरू करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी दिली.

पाटोदा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या ताब्यातील जमिनी प्रत्यक्षात लागवडीयोग्य असताना महसूल नोंदीमध्ये त्या 'पोटखराब' म्हणून नमूद करण्यात आल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांना पीककर्ज, पीकविमा, शेतकरी कार्ड तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यात अडथळा निर्माण होत आहे. प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन संबंधित जमिनींचे सर्वेक्षण करून पंचनामे करावेत व त्या जमिनींना लागवडीयोग्य क्षेत्र म्हणून घोषित करावे, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर, ज्ञानेश्वर कवठेकर, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, दीपक थोरात, राहुल बनसोडे, विजय हँकर, दादासाहेब वावडेकर, दत्तू थोरात, रामदास थोरात, अंकुश शिरोळे, तुषार तुरुकुमारे, लहू थोरात, भाऊसाहेब गरडे, मिलिंद सरपते यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT